आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २०२ वा ● शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●





## झरोका

एक – अहो, पालकमंत्री, पालकमंत्री म्हणजे काय हो, महाराष्ट्राच्या पालकमंत्री पदासाठी जी काही ओढाताण होत आहे ते आजच वाटते यातील गौडबंगाल काय असावे तेच कळत नाही, डोकं बधिर झाला आहे.

दुसरा – अरे, महाराष्ट्राचे पालकमंत्री, मुख्यमंत्री असतो त्याच पद्धतीने जिल्हा जिल्हा वार पालकमंत्री हा त्याच्या विभागाचा पालकमंत्री असतो परंतु सत्ताकरण्याच्या हवाशा पोटी मला हाच जिल्हा पाहिजे, मला तोच जिल्हा पाहिजे, म्हणून हे पाहिजे, तो पाहिजे, म्हणून मंत्री तगादा लावत असतात. आणि त्यातूनच संबंधित जिल्हाधिकारी हे आम्हाला हा मंत्री नको, ते मंत्री पाहिजे, असा अग्रह धरत असतात, त्यामुळे मुख्यमंत्री यांना पालकमंत्री पदासाठी तडजोड करण्यास अवघड जाते त्यामुळे पालकमंत्री पदाच्या संदर्भामध्ये मारक नको या अडचणीमुळे पालकमंत्रीपद हे आज घडीला अडगळीत पडल्याचे दिसते आहे. त्यामुळे तू कशाला डोक्याला ताण घेऊ नकोस.

एक – अहो, जिल्हावार समस्या या पालकमंत्री शिवाय सोडविता येत नाहीत पालकमंत्री नसल्यामुळे न्याय मिळत नाही त्यामुळे आम्ही काहीच करू शकत नाही म्हणून जिल्हाधिकारी हातवर करीत असतात, त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या समस्याकडे दुर्लक्ष होत असते म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, तू कितीही यरजाऱ्या मारल्या तरी काही फायदा होत नाही पालकमंत्री शिवाय पदाशिवाय दुसरा कोणताही पर्याय असू शकत नाही, कितीही कर्तबगारी जिल्हाधिकारी असला तरी तेही काही करू शकत नाहीत, पण अडांतोट मंत्री असला तरी त्याच्याशिवाय पर्याय नसतो त्यामुळे तू कशाला बडबड करतोस गप्प बस ना.

एक – अहो, असे म्हणून कसे काय चालणार जिल्हावार विकासासाठी जनतेने जागरूक राहिले पाहिजे आणि ते लातूरचेच घ्या ना मंत्री नाही, ना संत्री नाही, ते बाबासाहेब पाटील कुठे गेले की अमित देशमुख दारोदार फिरत आहेत, त्याची दयनागय अशी अवस्था झाल्यामुळे आम्ही देशमुख यांची गडी ढासळल्यासारखीच दिसते आहे, त्यामुळे पालकमंत्री पद काय असावे हे आज घडीला तारेवरची कसरत आहे. यामुळेच हा प्रश्न रेंगाळत आहे असेच म्हणावे काय, अशीच शंका येते.

दुसरा – अरे, तुला शहाणपण सुचले हेच महत्त्वाचे आहे, नाहीतर मागच्या प्रमाणे गिरीश महाजन हे मानगुटीवर बसले असते परंतु आज घडीला संजय बनसोडे ऐवजी बाबासाहेब पाटील हाच मानगुटीवर बसतो आहे, तीच घातक चर्चा अमित देशमुख यांना परवडत नाही, त्यामुळे सारा काही खेळ खंडोबा होत आहे त्यामुळे पालकमंत्री हा मारक नसावा पण पालक असावा अशीच कुजबूज सर्वसामान्य जनतेतून होताना दिसते आहे, त्यामुळे तू कशाला काळजी करतोस.

एक – अहो, असे नाही जनतेच्या विकासाची जाऊ द्या परंतु लाडकी बहिणी ऐवजी लाडका भाऊ उरावर बसतो आहे त्याचे काय म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, लाडकी बहीण, लाडका भाऊ, भाऊ जाऊ दे सर्वसामान्य जनतेपेक्षा कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आली आहे त्यासाठी पालकमंत्री हा विषय महत्त्वाचा ठरतो त्यासाठी काहीतरी उपाययोजना देवेंद्र फडणीस करतील का, हेच काळजी वाटते गप बस.




# पारदर्शी व गतिमान शासन प्रतिमा निर्मितीसाठी महसूल यंत्रणेने कार्य करावे – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

पुणे:– महसूल खाते शासनाचा चेहरा म्हणून ओळखले जाते. लोकाभिमुख प्रशासनासाठी महसूल यंत्रणेतील जिल्हाधिकारी यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी आठवड्यातील किमान दोन दिवस आपल्या कार्यक्षेत्रात ग्रामीण भागापर्यंत दौरे करावे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा आणि ती प्राधान्याने निर्गत करावी. महसूल यंत्रणेने आपली कार्यपद्धती गतिमान करून तत्परतेने जबाबदारी पार पाडावी ज्यायोगे नागरिकांमध्ये शासनाची पारदर्शी आणि गतिमान शासन अशी प्रतिमा निर्माण होईल असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



पुणे विभागातील महसूल अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, अपर आयुक्त कविता द्विवेदी, अपर आयुक्त समीक्षा चंद्रकार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, अतिरिक्त मुख्य सचिवांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र मुठे, मंत्रालयातील विशेष कार्य अधिकारी प्रविण महाजन, अरविंद अंतुलीकर, मुद्रांक विभागाचे उपसचिव सत्यनारायण बजाज तसेच विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

श्री. बावनकुळे म्हणाले, शासकीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीची व नियमांची नागरिकांना माहिती नसते त्यामुळे त्यांची विविध प्रकरणे शासकीय कार्यालयात प्रलंबित राहतात. शासनाच्या १०० दिवसांच्या महत्वाकांक्षी कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून महसूल यंत्रणेने कालबद्ध मोहिमेद्वारे अशी प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी. त्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक संदेश जाईल आणि थकित महसुलाची वसुली होईल. महसूल यंत्रणेच्या माध्यमातून शासन जनतेपर्यंत पोहोचते. शासनाचे लोकाभिमुख धोरण जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वांनी एक कुटुंबाच्या भूमिकेतून समन्वय ठेवून काम केले पाहिजे. महसूल यंत्रणेत दाखल प्रकरणांवर मंत्रालय स्तरावर नियमित देखरेख ठेवण्यात येत असल्याने प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत याची जाणीव ठेवावी असे सांगितले.

नवीन वाळू धोरणावर शासन स्तरावर काम सुरू असून देशातील सर्वोत्तम असे सर्वंकष वाळू धोरण अंमलात आणण्यात येणार आहे. नागरिकांना त्यांच्या सोयीच्या नोंदणी कार्यालयात दस्ताची नोंदणी करता यावी यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन योजना तयार करण्यात येत आहे अशी माहिती श्री. बावनकुळे यांनी दिली.

अधिकाऱ्यांनी महसूल वसुलीचे उद्दिष्ट साध्य करतानाच महसुलात वाढ होण्यासाठी नावीन्यपूर्ण कल्पना सादर कराव्या. शासनाकडून त्यावर सकारात्मकपणे निर्णय घेण्यात येईल. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सचोटीने काम करून वार्षिक मूल्यमापन अहवाल उत्कृष्ट दर्जाचा ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. नवीन पदनिर्मिती, पदोन्नती आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी सोडवण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील. भूसंपादन केलेल्या जमिनींचे कमी जास्त पत्रक तयार करणे व अधिकाराची अभिलेखात नोंद घेणे यास प्राधान्य देण्यात यावे असे निर्देश श्री.बावनकुळे यांनी दिले.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विभागातील महसूल यंत्रणेच्या कामकाजाची माहिती दिली. शासकीय महसुलाची वसुली, महाराजस्व अभियानांतर्गत केलेली कामे, अर्धन्यायिक प्रकरणे, बळीराजा शेत व पांदण रस्ते योजना, शंभर दिवस कृती आराखडा, गौण खनिजांची महसूल वसुली, ई–म्युटेशनद्वारे फेरफार, ई– चावडी, ग्रीस्टॅक योजना, लोकसेवा हक्क आयोग प्रकरणे, ई–ऑफिस कार्यान्वयन, शेतकरी आत्महत्या विषयक प्रलंबित प्रकरणे, रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन यासह विविध योजनांची विभागातील सद्यस्थितीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. शासनाच्या शंभर दिवस कृती कार्यक्रमाची विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येऊन उद्दिष्ट साध्य करण्यात येईल. त्यामुळे शासनाची प्रतिमा उच़ावेल आणि सामान्य नागरिकांचे जीवन सुकर होईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांनी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्र राबविण्यात आलेल्या महसूल विभागाच्या विविध योजनांच्या कार्यपूर्तीची आणि साध्य केलेल्या उद्दिष्टांची माहिती यावेळी दिली.

# मुख्यमंत्री चंद्रपूर दौऱ्यात राजकीय नाराजीनाट्य; विजय वडेट्टीवारांना मानाचे पान;सुधीर मुनगंटीवार नाराज?

चंद्रपूर:राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पहिल्यांदाच चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मात्र त्यांच्या या दौऱ्यात माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहतील का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्याचे दुसरे मुख्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे सुपुत्र मा.सा. कन्नमवार यांची आज १२५वी जयंती आहे. या १२५व्या जयंतीनिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज चंद्रपूरला येणार आहेत.

विशेष म्हणजे चंद्रपूरचे भाजप आमदार किशोर जोरगेवार हे या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि स्वागताध्यक्ष आहेत आणि या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व आजी माजी खासदार–आमदार यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. मात्र या कार्यक्रमाला भाजपचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार का याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. मुनगंटीवार यांच्या समर्थकांच्या मते सुधीर मुनगंटीवार यांचं नाव निमंत्रण पत्रिकेत प्रमुख पाहुण्यांच्या यादीत टाकण्यात आलं आहे. तर दुसरीकडे माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष पद देण्यात आलेलं आहे. तर माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांना या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे. मुनगंटीवार सम र्थकांच्या मते हा त्यांना डावलण्याचाच प्रयत्न आहे. त्यामुळे मुनगंटीवार आजच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता फार कमी आहे.

सुधीर मुनगंटीवारांच्या अनुपस्थितिवर आम दार किशोर जोरगेवारांची प्रतिक्रियाराज्याचे माजी मुख्यमंत्री मा.सा. कन्नमवार यांची आज १२५ वी जयंती आहे. या निमित्त चंद्रपुरात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मात्र या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि भाजप नेते सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार नाही. त्यांच्या या अनुपस्थितीवर आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जोरगेवार यांच्या मते या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या यादीत सुधीर मुनगंटीवार यांना स्थान देण्याचा निर्णय हा आयोजन समितीचा आहे. आयोजन समितीनेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद विजय वडेट्टीवार यांना दिलं आहे. त्यामुळे कुणाला अध्यक्ष करावं आणि कोणाला प्रमुख पाहुणे करावं याबाबतचा निर्णय सर्वस्वी आयोजन समितीचा होता.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार ट्युशन एरियातील बंद असलेली अष्टविनायक पोलीस चौकी पुन्हा सुरू

लातूर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. ९ जानेवारी रोजी सकाळी लातूर शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्याशी फोनवरून संवाद साधून ट्युशन एरियातील बंद असलेली अष्टविनायक मंदिराशेजारील पोलीस चौकी पुन्हा सुरू करावी, अत्यंत रहदारीचा परिसर असलेल्या ट्युशन एरियात हाणामारी टवाळखोरांचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी चार्लीची ग्रस्त वाढवावी, दामिनी पथक रात्री अपरात्री कायम ठेवावे, ट्युशन एरिया परिसरात ड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा मोबाईल नंबर सर्व ट्युशन चालकांना देण्यात यावा, अष्टविनायक पोलीस चौकीला पुरुष व महिला कर्मचारी कायमस्वरूपी नेमावेत, अशी त्यांनी सूचना केली.



या संदर्भाने शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांची काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी भेट घेवून ट्युशन एरियातील अनेक प्रश्नासंदर्भात चर्चा केली, सर्व सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल अशी ग्वाही पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी दिली. यावेळी माजी महापौर स्मिता खानापुरे, माजी नगरसेवक राजकुमार जाधव, राजु मोटेगावकर, धर्मराज जांभळे, महेश नागलगावे, सुवर्णा खानापुरे, शितल जायगावकर आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे लातूरमध्ये दोन दिवशीय राज्यस्तरीय अधिवेशन

लातूर –ज्येष्ठ नागरिक संघ लातूर द्वारा आयोजित महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉन ) चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे दि.११ व १२ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे ,अशी माहिती फेस्कॉमचेअध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

३४व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे जय्यत तयारी दिवाणजी व श्याम मंगल कार्यालय सावेवाडी येथे करण्यात आली असून ,या नगरीस कै. गुरुशांतप्पा नागप्पा लातूरे सभागृह असेल नाव देण्यात आले आहे .शनिवार दि.११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते ९.३० या वेळेमध्ये शोभायात्रा काढण्यात येणार आहे

ही शोभायात्रा गांधी पुतळा ते मुख्य रस्त्यावरून फिरून अशोक हॉटेल मार्गे दिवाणजी मंगल कार्यालय येथे विसर्जित होईल. सकाळी साडेनऊ वाजता अण्णासाहेब टेकाळे व अरुण रोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. सकाळी १० वाजता मुख्य सभागृहामध्ये या अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ तसेच स्वागत अध्यक्ष म्हणून खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे .यावेळी सन्माननीय पाहुणे म्हणून आमदार रमेश आप्पा कराड ,आमदार विक्रम काळे ,लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे ,लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त बाबासाहेब मनोहरे ,सामाजिक न्याय विभागाचे प्रभारी उपायुक्त अविनाश देवशेटवार यांची उपस्थिती राहणार आहे .यावेळी अध्यक्ष अरुण रोडे ,फेस्कॉमचे विद्यमान अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रामध्ये *ज्येष्ठांचे आनंदी जीवन* या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. सोमनाथ रोडे हे ज्येष्ठांना यावेळी मार्गदर्शन करतील.



आर. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. तिसऱ्या सत्रामध्ये *ज्येष्ठत्व ते श्रेष्ठत्व* या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. मैत्री फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. धनंजय गायकवाड हे यावेळी जेष्ठांना मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोकराव तेरकर हे राहणार आहेत. चौथ्या सत्रामध्ये दुपारी ४ वाजता *फेस्कॉम काल आज आणि उद्या* या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे .अरुण रोडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या चर्चासत्रामध्ये डॉ.बी. आर. पाटील लातूर, डॉ. सुरेखा देशमुख अमरावती, डॉ. दामोदर थोरात अंबाजोगाई ,मेजर डॉ. निर्मला कोरे नांदेड हे सहभागी होणार आहेत .सायंकाळी *निवृत्ती म्हणजे निष्क्रियता नव्हे* या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे .लातूरातील सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. मायाताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या व्याख्यानामध्ये प्रमुख वक्ते म्हणून माहिती व जनसंपर्क विभागाचे माजी संचालक तथा लेखक देवेंद्र भुजबळ हे प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठांना मार्गदर्शन करणार आहेत. *आरोग्यमय जीवन कसे जगावे* या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष डॉ. सी. एन.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या व्याख्यानामध्ये प्रमुख वक्ते म्हणून मिलिंद सरदार, माधवबाग हे ज्येष्ठांना मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दिनांक १२ जानेवारी२०२५ रोजी सकाळच्या सत्रामध्ये *हृदयरोग व घ्यावयाची काळजी* या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डॉक. संजय शिवपुजे यावेळी *ज्येष्ठांनी हृदयरोग व हृदयरोगाची काळजी कशी घ्यावी ?*याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. डॉ.राजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हे व्याख्यान होईल. फेस्कॉमचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चासत्रामध्ये *फेस्कॉम कार्याची भावी दिशा व वाटचाल* या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे .तसेच *ज्येष्ठांच्या कायदेविषयक समस्या* या विषयावर आयोजित व्याख्यानामध्ये जिल्हा विधी प्राधिकरण न्यायमूर्ती किर्तीकर हे व्याख्यान देणार आहेत .*ज्येष्ठांचे आरोग्य* या विषयावर आयोजित चर्चासत्रामध्ये लातूरातील सुप्रसिद्ध मधुमेह तज्ञ डॉ. चंद्रशेखर अष्टेकर ,श्र्वसन विकार तज्ञ डॉ. रमेश भराटे हे ज्येष्ठांना मार्गदर्शन करणार आहेत .तसेच *महिलांच्या कर्करोग समस्या* या विषयावर लातूर येथील ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ. मायाताई कुलकर्णी या महिलांना मार्गदर्शन करणार आहेत. पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे काका यांच्या अध्यक्षतेखाली हे चर्चासत्र होणार आहे.

रविवारी या अधिवेशनाचा समारोप होणार आहे.महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी ज्येष्ठांना कोणकोणत्या सवलती दिल्या याचा आढावा या पत्रकार परिषदेत बोलताना घेतला .ते म्हणाले की, जेष्ठ नागरिक यांना सर्वात जास्त सोयी सवलती देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे .सरकारने असे निर्णय घ्यावेत यासाठी फेस्कॉमच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, मान्यवरांनी आपल्याला याविषयी मदत करून मार्गदर्शन केले असल्याबद्दल त्यांनी या सर्वांचे आभार मानले .या अधिवेशनामध्ये ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे प्रवासात असलेली ५० टक्के सवलत पुन्हा सुरू करणे यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांना पत्र दिले आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात ज्येष्ठ नागरिकांना अनुक्रमे ३००० ते ४००० रुपये पालन पोषण भत्ता म्हणून दिला जातो हीच योजना महाराष्ट्र सरकारने सुरू करावी आणि त्यासाठी प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांना सरसकट किमान ३००० रुपये मिळावेत यासाठी प्रयत्न करावेत, ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळावर फेस्कॉम या संघटनेला ५०टक्के प्रतिनिधित्व मिळावे असा आग्रह धरावा, देवदर्शन सुलभ व्हावे म्हणून देवस्थान ट्रस्ट शिर्डी , प्रभादेवी येथे फेस्कॉमचे प्रतिनिधित्व द्यावे , केंद्र सरकारचे आर्थिक लाभ मिळविण्यासाठी ६५ वयाची अट रद्द करून ती ६० करावी ,तसेच एसटी प्रवासात देखील ६० वर्षापासून सवलत देण्यात यावी कारण निवृत्तीनंतर ६० ते ६५ हा काळ कठीण असतो हा टप्पा पार केला मग बिनधास्त ज्येष्ठ नागरिक ७५ च्या पुढे जातो. ग्रामपंचायत पासून ते महापालिकेच्या ज्येष्ठांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना तीन ऐवजी पाच टक्के तरतूद करावी ,जेष्ठ नागरिकांना अडचणीच्या वेळी तातडीने वैद्यकीय मदत मिळण्यासाठी (गोल्डन आवर हॉस्पिटल ऑन व्हील )ही सेवा राज्यभर सुरू करावी, गाव पातळीपर्यंत विरंगुळा केंद्र सरकारने उभी करावी अशा काही प्रमुख मागण्या या अधिवेशनामध्ये करण्यात येणार आहेत.

या पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक मंडळाचे माजी अध्यक्ष अरुण रोडे तसेच डॉ. बी. आर. पाटील ,प्रकाश घादगिने ,डॉ. सी. एन. जोशी ,आर. बी. जोशी, विवेक देशपांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# धर्मात काय बसलंय ?

धर्म हा वैयक्तिक असतो तो कोणासाठीही बंधनकारक नसतो, धर्म हा जाती-जातीसाठी त्यांच्या त्यांच्या विचारानुसार अंगीकारक असतं मग तो हिंदू, मुस्लिम असो की दलित असो त्यांच्या त्यांच्यासाठी तो अधिकृत असतं. परंतु तो कोणाच्याही बंधनात नसतो. जात आणि धर्माला बंधन नसते, विचाराला आणि कृती ना निर्बंध नसतात त्यामुळे माणूस म्हणून व्यक्तिगतरीत्या ज्याचा त्यांना हक्क असतो परंतु आज घडीला धर्माच्या नावावर जे वादंग निर्माण होत आहे ते मानवी जीवनाला घातकच असावे असे वाटते.

धर्म हा वैयक्तिकरित्या असला तरी समाज जीवनामध्ये त्याचा वेगळा अर्थ असू शकतो तो व्यक्तिकरित्या बंधनकारक असतो परंतु त्यानिमित्ताने सर्वसामान्य जनतेवर तो बंधनकारक राहत नाही कारण असे की माझ्या धर्माच्या नावावर कोणी माणूस गुलाम असू शकत नाही. सामाजिक जीवनामध्ये आणि राजकीय जीवनामध्ये धर्म हा महत्त्वाचा असला तरी तो बंधनकारक असू शकतच नाही माणुसकीच्या नावाखाली मानवतेच्या दृष्टीने विचार केला तर बुद्ध विचाराशिवाय दुसरा कोणताही पर्याय असू शकत नाही कधी नव्हे ते भारताच्या भवितव्यासाठी धर्म नव्हे तर फक्त बुद्धाचीच गरज आहे, असे असे प्रतिपादन नरेंद्र मोदी यांनी केल्यामुळे असे म्हटल्यास दुसरा कोणताही पर्याय असू शकत नाही, हे शानपण नरेंद्र मोदी यांना कळाल्यामुळे सर्वसामान्य जनतेत मन भरून आल्याचे दिसते आहे. कारण असे की, आजवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे हिंदू हिंदू म्हणून बोंबलत होते. परंतु अफगाणीच्या संदर्भामध्ये तालिबानी असो किंवा महाराष्ट्रातील नक्षलवादी असो त्यासाठी शांतता

## संपादकीय...

निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी काही कारवाई केली त्याचा संदर्भ घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बुद्धाची पायवाट स्वीकारली ती अनाठही नसावी असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

जग मे बुद्ध का नाम है, यही भारतीय शान है, हे आठवले, कवाडे यांचे संदर्भ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पटले असावे म्हणूनच ते आज घडीला भारताच्या भवितव्यासाठी युद्धाचे नसून बुद्धाचेच कर्तव्य आहे आणि तेच अनिवार्य असावे असे म्हणून जागतिक शांततेसाठी बुद्धाचा पर्याय सुचविला हे शहाणपण नरेंद्र मोदी यांना उशिरा कळाले, त्याचेच आश्चर्य वाटते अशीच चर्चा प्रसारमाध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे. वास्तवात आजपर्यंतच्या कार्यकाळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आजपर्यंतच्या काळात हिंदू हिंदू म्हणूनच जपमाळा केल्या परंतु ऐनवेळी शांततेचा संदर्भ घेताना बुद्धाच्या आठवण झाली, त्यामुळे जागतिक राजकारणात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचाराला महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते आहे यामुळे राजकीय वर्तुळात त्यांचे कौतुक होताना दिसते आहे. कारण असे की, धार्मिक कटुता कमी करण्याच्या संदर्भामध्ये जे काही पाऊल उचलायला पाहिजेत ते बुद्धाशिवाय पर्याय नाही आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराशी गफलत करता कामा नये अशीच कुजबूज सर्वसामान्य जनते व्यक्त होताना दिसते आहे.

बुद्धा अँड हीच धम्मा, या ग्रंथाच्या माध्यमातूनच भारतीय संविधानाचीच निर्मिती झालेली आहे. भारतीय संविधानाचा आदर्श हा मानवी मूल्य आणि माणुसकी जपणारा असून कायदा व सुव्यवस्थेचे प्रयोजन करणारा असल्यामुळे भारतात संविधानाला अन्यय साधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील महिला राष्ट्रपती झाल्या हे भारतीय संविधानाने सिद्ध करून दाखविले आहे. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध शिवाय भारतीयच नाही जागतिक राजकारणाला दुसरा कोणता पर्याय नाही असे म्हटल्यास वावगे ठरू नये, अशीच चर्चा सर्वसामान्य जनतेत व्यक्त होताना दिसते आहे.

गेल्या दहा वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे लाड पुरविणारे पत्रकारिता आज घडीला सावध झाल्यासारखे दिसते आहे, कारण प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या आजवरच्या कार्यकाळावर संशय निर्माण करून जो काही भडीमार करीत आहेत त्याचाच अनुच्छेद म्हणून आज घडीला तालिबानी किंवा नक्षलवादी कारवायाला पाबंदीसाठी कठोर कारवाईपेक्षा बुद्धाच्या शांततेचा मार्ग स्विकारण्याचा जो संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जो संदेश दिला आहे तो महत्त्वाचा वाटतो कारण असे की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सत्ता संपादन केल्या वेळीच हा शहाणपणा दाखविला असता तर तालिबानी किंवा नक्षलवाद्यांनी त्याच वेळी शरणागती पत्करून कायदा व सुव्यवस्थेला सहकार्य केले असते पण परंतु आज घडीला जे काही शहाणपण सुचले ते नरेंद्र मोदी यांच्यासाठी महत्त्वाचे ठरावे की काय, कारण उद्याचे तीन-चार वर्ष त्यांच्यासाठी लाभदायिक ठरावे, उद्या काल काय होईल ते बाब वेगळी असली तरी आज घडीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संदर्भात सर्वसामान्य जनतेतून कौतुक होताना दिसते आहे.

ओरिसा येथील प्रवासी भारतीय संमेलनामध्ये उद्घाटन प्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला संबोधित करीत असताना जागतिक भविष्याच्या संदर्भात बुद्धाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसावा त्यामुळे युद्ध नको बुद्ध हवा, असे स्पष्टीकरण करून तथागत बुद्धाचे गुणगौरव केले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच जागतिक स्तरावर तथागत बुद्धाचे विचार प्रगल्भ झाले हा विषय टाळता कामा नये, असे स्पष्टीकरण केल्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शहाणपणाचे कौतुक होताना दिसते आहे.

काळरात्र होता होता, पहाटे विना दिवस उजाडला आणि दिवसाच्या अंधारात सूर्यप्रकाश प्रकाशला अशीच अवस्था प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची झाली असावी कारण असे की उषःकाल होता होता, काळरात्र आली अरे पुन्हा पेटवा आयुष्याच्या मशाली अशीच गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची झाली असावी म्हणूनच त्यांना आज घडीला फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबरोबरच बुद्ध आठवतो आहे, हेही नसे थोडके, मग उद्याला गर्वाचे काय घेऊन बसलात, युद्ध नको तर बुद्ध शिकवा असे म्हटल्याशिवाय दुसरा कोणता पर्याय नसावा हेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सांगायचे असेल, यात नवल काय..?

# अपघात

लोके लहानपण देगा देवा असे नेहमीच म्हणत असतात,पण म्हातारपण देगा देवा असे कोणी म्हणत नाहीत.कारण म्हातारपणाच्या झळा या न सोसणाऱ्या अशाच असतात.

गोविंन्दनगरात वल्लभ नावाचा माणूस राहात असे. तो तुफान ताकदीचा होता.त्याची शरीरयष्टी दणकट होती.जणू तो पहेलवानासारखा दिसत होता,नव्हे तर तो पहेलवानच होता.त्याने आपल्या पिळदार ताकदीच्या भरवशावर कित्येक कुस्त्या मारल्या होत्या,कित्येक आखाडेही आपल्या नावावर केले होते.याच कुस्त्यातून त्याने आपले नाव पंचक्रोशीत पसरवले होते.शेकडो लोके त्याला ओळखत असत.

त्याला दोन मुले होती.दोन्ही मुलांचे लग्न झाले होते.ते आपल्या पत्नीसमवेत सुखात राहात होते.मोठ्याचे नाव मंगेश व पत्नीचे नाव गोकुळा तर लहान पोराचं नाव सुरेश व पत्नीचे नाव मधुरा होते.

जवळंच स्मशान होतं.त्या स्मशानात जातांना मोठा रस्ता ओलांडून जावे लागत होते.ज्या रस्त्यावरुन मोठमोठी जड वाहने जायची.हा रस्ता ओलांडणे म्हणजे तारेवरची कसरत होती.कित्येक अपघात याच रस्त्यावर झालेले होते.

वल्लभचे जीवन कुस्त्या लढता लढता गेले.त्याला त्या कुस्त्या लढता लढता केव्हा म्हातारपण आले ते कळलंच नाही.वल्लभ जसा म्हातारा झाला.तशी त्याची मुले तरुण झाली होती.मुले मात्र त्याची चांगली निघाली नव्हती.ती त्याला लय त्रास देत होती.

वल्लभला आता जुने दिवसं आठवत होते.त्या आखाड्यात रंगलेल्या दंगली आठवत होत्या.कित्येक मारलेले मैदान आठवत होते,नव्हे तर कित्येक पहेलवानालाही गारद केलेले आठवत होते.पण आज तोच वल्लभ जीवनाच्या आखाड्यात हारत चालला होता.

वल्लभने लहानपणापासून आपल्या मुलांना उन्हातून सावलीत नेले होते.त्यांना चांगले शिकवले होते.त्यांना चांगले खावू पिवू घातले होते.त्याने कष्ट उपसले होते.पण लेकराच्या केसालाही धक्का लागू दिला नव्हता.याचबरोबर त्याने आपली पहेलवानकीही सांभाळली होती.

तरुणपणात कष्ट उपसतांना भयंकर त्रास झाला होता.मुलांचं आजारपण आलं की रातरात जागणारा वल्लभच होता,नव्हे तर सटवाई लागली म्हणून रात्री अपरात्री कोणाला न सांगता आपल्या दोन हातावर आपल्या बाळाला घेवून मातामायच्या देवळात घेवून जातानाचे दिवस त्याला आठवत होते.त्यांचा टाहो,त्यांचे रडणं........ सारं काही त्याला आठवत होतं.बाळानं शौच केली की तोच पुढे होवून मुलांना त्रास होवू नये म्हणून साफ ठेवायचा.स्वत: मात्र काही न घेता फक्त न फक्त बाळासाठी कपडे घेवून देणे हे त्यानं जीवनात प्रथम कर्तव्य मानले होते.

आज त्याचे म्हातारपण त्याला डीवचत होतं.मुलांचा सर्व काही सांभाळ केलेला असतांनाही मुले मोठी झाली असता ती आपल्या बापाची सेवा करीत नव्हती.त्याला फार त्रास देत होती.ती मुले तो धोतरात शौच करतो म्हणून त्याला उपाशी ठेवू लागली.तसेच तो शौच करतो म्हणून त्याला एकाच कपड्यावर ठेवू लागली.तो बडबड करतो म्हणून त्याला बाजूच्या तट्ट्याच्या खोलीत एकटेच ठेवू लागली.

वल्लभने आपल्या हयातीत मोठे घर बांधले होते,मुलांना राहायला होईल तसेच मलाही राहता येईल या हेतूने.पण त्या घरात केवळ मुलंच राहात होती.वल्लभसाठी त्यांनी वेगळी तट्ट्याची खोली इमारतीच्या बाजूला बांधली होती.थंडीच्या दिवसात व आजारपणातही त्याला पांघरायला गोधळी नशीब नव्हती. घर नावावर होते.पण अंगात चालण्याचे बळ नव्हते.कोणाला सांगावे तर कोणी तट्ट्याच्या कमऱ्याचा वास येतो म्हणून तिथे जायला तयार नव्हते.तोच तो विचार त्याला येत होता.शेवटी विचार करता करता व आजारपणामुळे खंगून जावून वल्लभने जवळंच पडलेली दोरी घेतली.ती तट्ट्याच्या कमऱ्याच्या छताला बांधली व धाड्दिशी त्याने फास आवळला.तसा तो गतप्राण झाला एका क्षणात.मनात विचार होता की'मी खावू शकत नाही मकान तर तुम्हालाही खावू देणार नाही.'

तरुणपणी मोठमोठ्या कुस्त्या मारलेला पहेलवान म्हातारपणातील जाचाला कंटाळून त्या जाचरुपी पहेलवानासमोर हारला होता.स्वार्थी मुलांच्या स्वार्थपणाची शिकार होवून.

हा अपघात होता.आयुष्याच्या उंबरठ्यावर झालेला.सर्वांनी रस्त्यावरचा अपघात बघितला होता. पण घरातही अपघात होतो हे मात्र कोणीही जाणत नव्हते.

सकाळ झाली होती.सकाळचे नव वाजले होते. अजुनही तट्ट्याच्या खोलीचा आवाज येत नव्हता.काय झालं ते माहीत नव्हते.अजुनही दोन मुलांपैकी कोणी तिकडे फिरकले नव्हते.तशी गोकुळा म्हणाली,

''काय झाले बुढ्यास्नी पाहा न हो.''

गोकुळा मंगेशची पत्नी.तिने म्हटले म्हणून मंगेश पाहायला गेला.तो काय! त्याचा चेहरा पडला.तो धाड्कन खाली पडला.धनी खाली का पडला? म्हणून गोकुळा पाहायला गेली.तोच तिच्या पाहिलेला प्रकार लक्षात आला.आपल्याच शिकवणुकाचा प्रकार म्हणून ती गप्प झाली.क्षणात वेळ न दवडता तिने तो पाश वल्लभच्या गळ्यातून काढला.पोलिस तक्रार होवू नये म्हणून तशी काळजी घेतली.तिने वल्लभला आडवे झोपवले व धाय मोकलून रडू लागली.

गोकुळा का रडते म्हणून आजुबाजूचे लोके न् लोके गोळा होवू लागले.शेवटी वल्लभ मेल्याची पुष्टी झाली.मयतीचे सामान आणले गेले.वल्लभची अंत्ययात्रा निघाली.बँडबाजा सारे काही लावले गेले. तिरडी फुलांनी सजविण्यात आली.नातवंडापासून तर मुलांसुनापर्यंत सारेच काही रडू लागले.पंचक्रोशीतून सर्व लोके गोळा झाले.

अंत्ययात्रा मोठ्या थाटामाटात निघाली.ती स्मशानात पोहोचली.लोकं लाकडं काढू लागलेत.तोच मोठा पोरगा म्हणाला,

''माझ्या बाच्या शरणाला लाकडे नकोत. पहेलवान होता.गोवऱ्यांनी पेटवूया.''

गोवऱ्या महाग होत्या.पण बाप मेल्यावर त्या गोवऱ्यांना किंमत नव्हती.जीवंतपणी बापाला किंमत नव्हती.मात्र आता बाप मेल्यावर बापाला किंमत आली होती.अग्नी दिला गेला.शरण पेटलं.तोच टिकोरी फोडून पोरं माघारी फिरली.

ती रस्त्यावरुन चालत होती.आपल्या बापाच्या पहेवानकीला आठवत होती.आपल्या बापाच्या केलेल्या गोष्टी आठवत होत्या नव्हे तर आपल्या बापाचं राबणं त्यांना आता आठवत होते.शेवटी आपण त्यांच्यासाठी काय काय केलं तेही आठवत होते. तोच एक पाठीमागून गाडी आली.ती थेट त्या दोन्ही भावाच्या उरावरुन गेली.दोघेही जागीच मरण पावले.

'मी नाही खावू शकत मकान तर तुम्हालाही खावू देणार नाही.'हे म्हाताऱ्याच्या तोंडचे वाक्य.आज खरे झाले होते.नियतीने खरा न्याय केला होता.त्या दोन्ही लेकरांसोबत.जशी करनी केली होती,तसे नियतीने त्याचे फळंही दिले होते.

सगळी मंडळी म्हाताऱ्याने पोरांना सोबती नेले असे म्हणत होते.पण तसे काही नव्हते.हे करनीचे भोग होते.गोकुळा व मधुराला सर्वकाही भेटले होते. पण पती मात्र हिरावून नेले होते हक्काचे पती तेही एका अपघातात.त्या अपघाताने सारे संपवले होते.सर्व ऐश्वर्य इथंच ठेवले होते.ज्या ऐश्वर्याचा त्या लेकरांनी उपभोग तर घेतला होता.पण त्या प्रती ते जागले नव्हते.

**अंकुश शिंगाडे**
**नागपूर**
**९९२३७४७४९२**

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री



भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# महिलांसाठी मोफत सीटी बस प्रवास योजना

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना हातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका, मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा-या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून दिनांक १९.१२.२०२४ पासून पुढील ठिकाणी संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय, लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे रजिस्ट्रेशन करुन घ्यावे असे कळविण्यात आले होते.

लातूर शहर हद्दीत राहणा या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी असे पण कळविण्यात आले होते व त्याची मुदत १०.०१.२०२५ पर्यंत ठेवण्यात आली होती, परंतु महीलांची स्मार्ट कार्डची मागणी लक्षात घेता ती मुदत व कार्ड वाटपाची मुदत २०.०१.२०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे व तोपर्यंत सदर ची योजना पुर्वीप्रमाणेच चालू राहील याची शहर बस मधुन प्रवास करणा-या लातूर शहर महानगरपालिका, लातूर हद्दीतील राहणा-या सर्व महिलांनी नोंद घ्यावी.

# निष्ठापूर्वक अभ्यासातूनच विद्यार्थ्यांची ध्येयपूर्ती होते- वैंशालीताई देशमुख



लातूर -ज्ञान' ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची बाब असून ज्ञानाच्या कक्षा विस्तारताना माहितीचे रूपांतर ज्ञानात व्हावे यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन व सातत्यपूर्ण अभ्यास केला तर यशाचा महामार्ग खुला होतो व विद्यार्थ्यांची ध्येयपूर्ती होते. असे प्रतिपादन महाराष्ट्रातील नामवंत अकॅडमी स्किल कोच वैशालीताई देशमुख-दुडीलें यांनी केले.

यावेळी त्या स्वामी विवेकानंद विद्यालयात इ.९वी/१०वी च्या विद्यार्थ्यांसाठीच्या 'विद्यारंभ' या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्रा.विभुते आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना देशमुख म्हणाल्या की, विद्यारंभ' या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना नियम, तप, आरोग्य, मनशुद्धता, सोशल मिडीया पासून अंतर ठेवून घ्यावयाची काळजी, स्वाध्यायाची संकल्पना यांसह माहिती आणि ज्ञानातला फरक कसा ओळखावा व स्वतःचे करिअर घडवण्यासाठी निष्ठापूर्वक अभ्यास कसा करावा याविषयी त्यांनी सविस्तर माहिती आपल्या मार्गदर्शनातून दिली.

प्रारंभी प्राचार्य गोविंद शिंदे यांनी प्रास्ताविकात संस्था आणि शाळेने राबवलेले उपक्रम व गुणवत्तेची माहीती देऊन विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी 'विद्यारंभ' चे आयोजन केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने उपस्थित विद्यार्थ्यांनी सकारात्मक मते मांडून निरीक्षणे नोंदवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अब्दुल गालीब शेख यांनी तर आभार प्राचार्य मारुती सुर्यवंशी यांनी मानले.

# पुरुषांच्या या सवयी होऊ शकतात नपुंसकत्वाचे कारण, ही आहेत लक्षणे

गेल्या काही वर्षांपासून पुरुषांमध्ये वंध्यत्वाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी असणे किंवा शुक्राणूंची गुणवत्ता कमी असणे यामुळे त्यांच्यात वंध्यत्व येत आहे. खराब जीवनशैली आणि खराब आहार हे यामागचे प्रमुख कारण मानले जाते, पण त्याला इतरही अनेक कारणे आहेत, ज्यामुळे पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होते, परंतु त्यांना याची जाणीव नसते.



चला आम्ही तुम्हाला सांगतो की कोणत्या सवयींमुळे पुरुषांमधील शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते. सर्वप्रथम, शुक्राणूंची संख्या किती असावी, हे जाणून घेऊया. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, जर पुरुषाच्या वीर्यामध्ये प्रति मिलिलिटर शुक्राणूंची संख्या १५ दशलक्षांपेक्षा कमी असेल तर ती शुक्राणूंची कमतरता मानली जाते. या स्थितीत पुरुषाचा बाप होण्यात अडचण येऊ शकते. जर ही संख्या कमी राहिली आणि वाढली नाही तर माणूस वंध्यत्वाचा बळी ठरतो.

या सवयींमुळे वंध्यत्वाचा धोका

दारूचे अतिसेवन

ज्येष्ठ फिजिशियन सांगतात की काही पुरुषांमध्ये दारूचे व्यसन लक्षणीयरीत्या वाढते. अल्कोहोल शरीरातील टेस्टोस्टेरॉनची पातळी लक्षणीयरीत्या कमी करते, ज्यामुळे शुक्राणूंची संख्या देखील कमी होऊ लागते. जास्त प्रमाणात मद्यपान करणाऱ्या पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होण्याची समस्या दिसून येते.

स्टेरॉइडचा वापर

अनेक पुरुष बॉडी बनवण्यासाठी स्टेरॉइडचा वापर करतात, पण याचा शुक्राणूंच्या संख्येवर मोठा परिणाम होतो. जे पुरुष ॲनाबॉलिक स्टेरॉइड घेतात आणि दीर्घकाळ सेवन करतात, त्यांच्या शुक्राणूंची संख्या कमी होते. जीममध्ये जाणाऱ्या पुरुषांमध्ये ही समस्या अधिक दिसून येते.

मानसिक तणाव

आजच्या युगात पुरुषांनाही वाईट मानसिक आरोग्याचा सामना करावा लागतो. या मानसिक ताणामुळे पुरुषांमध्ये वंध्यत्वही येऊ शकते. म ानसिक तणावामुळे ज्या पुरुषांना चिंता किंवा नैराश्याचा सामना करावा लागतो, त्यांच्या शुक्राणूंची संख्या कमी होते.

# ६७ व्या अखिल भारतीय प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञांच्या परिषदेत डॉ. कल्याण बरमदे संपादित दोन वैद्यकिय पुस्तकांचे थाटात प्रकाशन

लातूर : लातूर येथील ख्यातनाम वंध्यत्व निवारण तथा स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांनी संपादित केलेल्या दोन वैद्यकिय पुस्तकांचे प्रकाशन मुंबई येथे सुरु असलेल्या ६७ व्या अखिल भारतीय प्रसूती आणि स्त्री रोग तज्ज्ञांच्या परिषदेत थाटात करण्यात आले.




डॉ. कल्याण बरमदे व डॉ. प्रियांकुर रॉय संपादित ' प्रिझर्व द युटेरस' मॅन्युअल ऑन अर्थात 'गर्भपिशवी वाचवण्याचे उपाय ' आणि डॉ. कल्याण बरमदे व डॉ. ऋचा शर्मा संपादित ' मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी अँड फॉलोअप केअर ' या दोन वैद्यकिय पुस्तकांचे प्रकाशन भारतीय प्रसूती आणि स्त्रीरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयदीप टांक , डॉ. माधुरी पटेल, डॉ. हृषिकेश पै, डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ. निरंजन चव्हाण, डॉ. निरंजन चव्हाण, डॉ.परिक्षित टांक आणि डॉ. सुवर्णा खाडिलकर आणि फॉग्सी कार्यालयाचे पदाधिकारी यांच्या हस्ते थाटात करण्यात आले.

मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या ६७ व्या अखिल भारतीय प्रसूती व स्त्री रोग तज्ज्ञ परिषदेस डॉ. कल्याण बरमदे यांना विशेष निमंत्रित म्हणून पाचारण करण्यात आले आहे. ही परिषद मुंबईच्या बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समधील जिओ कन्वेशन सेंटर येथे संपन्न होत आहे.

या ६७ व्या अखिल भारतीय पातळीवरील पाच दिवस चालणाऱ्या या परिषदेत स्त्री रोग विषयक विविध सत्रांचे आयोजन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन , कार्यशाळा, शोध निबंध सादरीकरण, समूह चर्चा होणार आहे. डॉ. कल्याण बरमदे यांना या राष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. कल्याण बरमदे यांना विशेष निमंत्रित मार्गदर्शक म्हणून पाचारण करण्यात आले आहे. डॉ. कल्याण बरमदे हे भारतीय स्त्री रोग तज्ज्ञ संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी असून त्यांनी राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पार पडलेल्या अनेक प्रसूती व स्त्री रोग आणि वंध्यत्व निवारण तज्ज्ञांच्या परिषदेत सहभाग नोंदवला आहे. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी आपले शोध निबंधही सादर केले आहेत. मुंबईत पार पडत असलेल्या या परिषदेत भारतातील विविध राज्यातील ११ हजार ५०० हून अधिक स्त्री रोग तज्ज्ञ सहभागी झाले आहेत. लातूरसारख्या भागात अतिशय उत्कृष्ट दर्जाची वैद्यकीय सेवा व सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या डॉ. कल्याण बरमदे यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. या परिषदेत गुरुवारी डॉ. बरमदे यांनी लॅप्रोस्कोपिक सुरक्षितता, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. तर, शुक्रवारी त्यांनी हिस्टेरोस्कोपीमधील गुंतागुंत या विषयावर व्याख्यान दिले.

वैद्यकीय क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या डॉ. कल्याण बरमदे यांचे या पुस्तक प्रकाशनाच्या अनुषंगाने वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## राशीभविष्य ११ जानेवारी २०२५

मेष : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण

वैवाहिक जोडीदाराच्या मदतीने काही आनंदाच्या घटना घडू शकतील. जोडीदाराच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

वृषभ : शुभ रंग: लाल: शुभ दिशा: उत्तर

व्यवसाय–विस्ताराच्या नव्या संधी आकर्षित करतील. भागीदारीचे प्रस्ताव फायदेशीर ठरतील. सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

सासूरवाडीची वेळीच मिळालेली मदत अमूल्य ठरेल. व्यवसाय विस्तार यातून प्सन्न घटना घडतील.

कर्क : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर

आपल्या आवडीच्या गोष्टीसाठी वेळ काढावा लागेल. त्यातून पुरेसा आनंद मिळू शकेल. उत्पन्नाचा नवा मार्ग मिळेल.

सिंह : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:उत्तर

पैशाची कामे मात्र मनासारखी मिळू शकतील. आपापल्या क्षेत्रात योग्य गुरू भेटतील. दूरचे प्रवास हितकारक ठरतील.

कन्या : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व

आर्थिक ओघ मंद असला तरी त्यात नेमकेपणा मात्र राहील. खर्चाची सोय करता येईल एवढे उत्पनन नक्की चालू राहील.

तुळ : शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा: दक्षिण

एखाद्या जवळच्या मित्राची नाराजी अस्वस्थ करील. म ुलांचे वागणे बेचैनी वाढविल. यातूनही मार्ग सापडत राहील.

वृश्चिक : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व

नव्या घराचे स्वप्न बऱ्याच अंशी आकाराला येईल. येणारी आवक बऱ्याच अंशी निर्धोक राहील. आर्थिक व्यवहार फायदेशीर ठरतील.

धनु : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व

नोकरावर किंवा हाताखालील व्यक्तीवर टाकलेला जास्तीचा विश्वास त्रासदायक ठरेल. हितशत्रूपासून त्रास होणे शक्य.

मकर : शुभ रंग: हिरवा : शुभ दिशा: पूर्व

नोकरी–व्यवसायासंबंधीचे उच्च ज्ञान किंवा नवे तंत्रज्ञान अत्यंत फायदेशीर ठरेल. महिलांना प्रगतीचा विशेष टप्पा गाठता येईल.

कुंभ : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर

आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा. सरकारी कामातील दिरंगाई महागात पडेल. वृद्धांचे आजारपण पळापळ वाढवील.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण

लेखी कागदपत्राशिवाय मोठे व्यवहार करणे म्हणजे अंधाऱ्या खाईत उडी घेण्यासारखे होईल. आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा.

# माझी माय मंदीर परिवाराच्या वतीने संजय पाटील यांचा सपत्नीक सत्कार

लातूर : उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित मराठवाडा स्तरीय सन २०२३–२०२४ चा उत्कृष्ट वार्ता गटातील प्रथम पुरस्कार चाकूर येथील पत्रकार संजय पाटील यांना जाहीर झाला आहे. त्याबद्दल चाकूर येथील 'माझी माय' मंदीर परिवाराच्या वतीने संजय पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.



उत्कृष्ट वार्ता गटातून मराठवाडा स्तरीय प्रथम पुरस्कार संजय पाटील यांना जाहीर झाल्याबद्दल माय मंदिर परिवाराच्या वतीने त्यांचा ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक बळीरामजी सोनटक्के, माजी सभापती तथा नगरसेविका हिरकणाताई लाटे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी शंकर सोनटक्के, संभाजी सोनटक्के राष्ट्रीय खेळाडू शिवकुमार सोनटक्के, विशाल विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक अजयकुमार नाकाडे, माजी सरपंच संगमेश्र्वर जनगावे, युवा नेते सागरभैया होळदांडगे, सेवानिवृत्त आर्मी अधिकारी जगन्नाथ कल्याणे, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर, भजनी मंडळी यांच्यासह 'माय मंदिर' परिवारातील सदस्य, आप्तस्वकीय, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मागील १५ वर्षापासून मराठवाडास्तरीय उत्कृष्ठ वार्ता, शोध वार्ता या दोन गटात पुरस्कार वितरणाचे आयोजन केले जाते. पुरस्कार वितरणाचे हे १६ वे वर्ष आहे. यावर्षी जाहीर झालेल्या पुरस्कारात उत्कृष्ट वार्ता गटातून प्रथम पुरस्कार चाकूर येथील पत्रकार संजय पाटील यांना त्यांनी लिहलेल्या राज्यात सुप्रसिद्ध असलेल्या चाकूर येथील माय मंदिरावरील आईच्या प्रेमापोटी तीन मुलांनी बांधले मंदिर या बातमीस मिळाला आहे. अर्जुन मूद्दा यांच्यावतीने जेष्ठ पत्रकार कै.महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ रोख पाच हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# आ.रमेशआप्पा कराड यांच्या जनसेवेचा वा्रकरी या दिनदर्शिकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

लातूर– भारतीय जनता पार्टीचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार मा. रमेशआप्पा कराड यांचे आकर्षक छायाचित्र असलेल्या जनसेवेचा वारकरी २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शुक्रवारी भाजपाच्या संवाद कार्यालयात हभप रामकृष्ण महाराज शास्त्री आणि ह भ प नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरीकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.



आ. रमेशआप्पा कराड जनसेवेचा वारकरी २०२५ या वर्षाची दिनदर्शिका अभिमान वायबसे यांनी तयार केली असून या दिनदर्शिकेचे प्रकाशन घरणी येथील आनंदवन आश्रमाचे हभप रामकृष्ण महाराज शास्त्री आणि ह भ प नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले असून याप्रसंगी जेष्ठ पत्रकार अरुण समुद्रे, संत गोपाळ बुवा शुगर मिल्स साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, मराठवाडा नेताचे संपादक रामेश्र्वर बद्दर, सामाजिक कार्यकर्ते भारत बरूरे, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड, रेणापूर तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

त्यागमूर्ती प्रयागआक्का कराड यांचे मार्गदर्शन, आशीर्वाद आणि कृपाछत्र कराड परिवाराला लाभले त्यामुळेच या परिवारातील अनेक जण जनसेवेसाठी सतत कार्यरत आहेत. अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारे कराड परिवार असल्याचे सांगून हभप रामकृष्ण महाराज शास्त्री यांनी असंख्य वारकरी पंढरीच्या पांडुरंगा साठी आहेत तर रमेश आप्पा कराड हे जनसामान्यांची सेवा करणारे वारकरी आहे. देव, धर्म, देश आणि संस्कृती जतन करण्याचे कार्य त्यांच्या हातून अविरतपणे व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली तर ह भ प नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरीकर यांनी जनसेवेचे वृत्त हाती घेतलेल्या रमेश आप्पा कराड यांनी मतदारसंघाचेच नव्हे तर राज्याचे नेतृत्व करावे त्यांना उज्वल भविष्य प्राप्त व्हावे असा आशीर्वाद दिला. पत्रकार अरुण समुद्रे आणि भाजपाचे राजेश कराड यांनी आपल्या भावना व्यक्त करून वायबसे यांच्या दिनदर्शिकाचे कौतुक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

याप्रसंगी भाजपाचे पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, ज्येष्ठ कार्यकर्ते विजय क्षिरसागर, अमोल पाटील, धनराज बरुरे, संगायो समितीचे लातूर शहर अध्यक्ष शिवसिंह सिसोदिया, रेणापूरचे अध्यक्ष वसंत करमोडे, हभप शंकर महाराज लातूरकर, विवेक बाजपाई, विजय काळे, प्रताप पाटील, ज्ञानोबा भिसे, सुकेश भंडारे, शरद दरेकर, राजकारण साठे, गोपाळ शेंडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती प्रारंभी अभिमान वायबसे आणि ऋषी वायबसे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

## इतिहासात आजचा दिवस ११ जानेवारी २०२५

अंतरराष्ट्रीय

१८४२– विल्यम जेम्स या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाचा जन्म. लँगबरोबर काम करून मानसिक विकारांचा शरीरक्रियेशी संबंध स्पष्ट करणारी जेम्स–लँग प्रणाली त्याने तयार केली.

१९४२– जपानी सैन्य डच ईस्ट इंडिजमध्ये (आता इंडोनेशिया) घुसले.

१९४४– काऊंट सिआनो या मुसोलिनीच्या जावयास म ुसोलिनीच्या आज्ञेवरून फितूर म्हणून मारण्यात आले. थो इटलीचा परराष्ट्रमंत्री होता.

२००७– अफगाण व नाटोच्या हल्ल्यात ८० तालिबानी ठार.

२००७– बांगलादेशात आणीबाणी लागू.

२००८ – दक्षिण आफ्रिकाचा अष्टपैलू खेळाडू शॉन पोलॉकने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याची घोषणा केली.

राष्ट्रीय

१८५८– तात्या टोपे व इंग्रज यांच्यात अखेरची लाढाई. यानंतर नानासहेब पेश्वयांनी नेपाळकडे प्रयाण केले.

२००८ – सर्वसामान्यांच्या आवाक्यातली कार सादर केल्यानंतर टाटांनी लोकांना 'शुद्ध पाणी' देण्याचे स्वप्न पाहिले. पाणी शुद्ध करण्यासाठी वॉटर प्युरीफायर स्वस्तात उपलब्ध करून देण्याचा ध्यास त्यांनी घेतला.

जन्म

१८२२– जर्मन पेशीशास्त्रज्ञ थिओडोर श्वान यांचा जन्म. व्जोगोल (मानवी बीजांडे) एकपेशी असतात, हे त्याने सिद्ध केले.

१८९८– 'ययाती' चे ज्ञानपीठविजेते मराठी साहित्यिक विष्णू सखाराम खांडेकर यांचा जन्म.

१९५४ – चंद्रकांत भोंजाळ या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी अनुवादकचा जन्म.

१९७३– राहुल– 'द ग्रेट इंडियन वॉल' – द्रविडचा जन्म.

निधन

१९२८– इंग्रजी कादंबरीकार थॉमस हार्डी याचे निधन.

१९५४– स्वातंत्र्यापूर्व काळातील सायमन कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड सायमन यांचे निधन. भारतात राजकीय सुधारणा करण्याचे काम या समितीवर सोपविण्यात आले होते.

१९६६– काकासाहेब गाडगीळ यांचे निधन.

२००८ – जगातील सर्वात उत्तुंग माऊंट एवरेस्टच्या शिखरावर पहिले मानवी पाऊल ठेवणारे सर एडमंड हिलरी यांचे निधन.

२००८ – ज्येष्ठ विचारवंत य. दि. फडके यांचे निधन.

# विज्ञान मंडळाच्या वतीने' बालविवाह प्रतिबंध व विज्ञान युगात मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व ' या विषयावर पथनाट्य सादर

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान मंडळ २०२४–२५ तर्फे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर मौजे दावतपूर येथे ❋बालविवाह प्रतिबंध व विज्ञान युगात मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व❋ ह्या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले.लहान वयात लग्न झाल्यामुळे या मुलींना त्यांच्या लैंगिकतेविषयी पुरेशी माहिती नसते.कुटुंब नियोजन,गर्भधारणा आणि गर्भारपणातील काळजी यासारखे विषय त्यांच्यासाठी दुरचेच ठरतात.त्यामुळे कधी बाळ जन्माला येण्याआधी,कधी लगेच तर कधी एक–दोन वर्षांतच त्यांना बाळ गमवावे लागते.बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहेच,परंतु आजच्या काळात असे घडणे म्हणजे नव्या विचारसरणीला काळीमा फासणारे आहे. महाविद्यालयातील विज्ञान मंडळाच्या प्रभारी प्रा.डॉ. दीप्ती ढेरे,डॉ.श्र्वेता लोखंडे,प्रा. शीलेश गावित,प्रा.पूजा नंदगावे,प्रा. ऐश्र्वर्या अंधारे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान मंडळाच्या विद्यार्थ्यांनी ह्या पथनाट्याचे सादरीकरण राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर सुरू आहे त्या ठिकाणी म्हणजे दावतपूर येथे केले. पथनाट्यामधे ठाकूर अनुष्का, रितेश खंडेलवाल,पाटील श्रीनिवास,जाधव अविनाश,झंवर यश,मलवडे श्र्वेता,भीसे रूपाली, छत्रबंद शिवानी,रोढे अपर्णा,सूर्यवंशी सरस्वती, दाताळ साक्षी,मीनीयार आकांक्षा ह्यांचा सहभाग होता.तसेच, विज्ञान मंडळाची अध्यक्ष जाधव श्रेया व रोहिणी कांबळे ह्यांचा सहभाग लाभला. याप्रसंगी विज्ञान मंडळाच्या प्रभारी प्राध्यापिका डॉ.दीप्ती ढेरे,डॉ.श्र्वेता लोखंडे,डॉ.शिलेश गावित,प्रा.मेघा आत्राम,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरज कोल्हे,डॉ.अमोल ठोसर,रासेयो शिबिरातील विद्यार्थी,जिल्हा परिषद शाळा दावतपूरचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक,विद्यार्थी तसेच गावातील समस्त गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते.






# मनसेच्या वतीने लातूरच्या राजस्थान विद्यालयाच्या प्रांगणावर तिसरे भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

लातूर – महाराष्ट्र नवनिर्माण सेना लातूर व कृषी नवनिर्माण ॲग्रो प्रोडयूसर कंपनी, नरवटवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या परिसरात दि. ७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान कृषी नवनिर्माण २०२५ या राज्यस्तरीय तिसऱ्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी पत्रकार भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

गेल्या ५ ते ७ वर्षापासून मराठवाडयातील शेतकरी कधी कोरड्या तर कधी ओल्या दुष्काळाला सामोरा जात आहे. सततच्या हवामानातील बदलामुळे कधी पाऊसच नाही तर कधी जास्तीचा पाऊस अशी विचित्र परिस्थीती झाल्याने कोणतेच पीक मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या हाती लागायला तयार नाही. त्यामूळे मराठवाडयातील शेतकरी कर्जबाजारी होऊन वैफल्यग्रस्त झाला आहे अशा बिकट परिस्थीतीमुळे मराठवाडयातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. या दुष्काळी परिस्थीतीत शासन मात्र शेतकऱ्यांना कसलीही मदत किंवा दुष्काळवरील उपाययोजना करावयास तयार नाही त्यामुळे कमी पावसात पाण्याचे व्यवस्थापन करुन आधुनिक तंत्रासह शेती कशी करावी शेतीला जोडधंदयाची




जोड देऊन शेतकऱ्यांना शेतीक्षेत्रात स्वावलंबी होता यावे शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीपद्धतीतून बाहेर पडून आधूनिक शेतीची कास धरुन त्यांचे उत्पन्न किमान दुपटीने वाढावे, प्रदर्शनातील व्यापक प्रबोधनातून शेतक–यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारु नये, जागतीक दर्जाचे नवे शेतीतंत्र शेतीतील साधन सामग्री अत्याधुनिक शेती अवजारे कृषीतील नवनविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना माहीती व्हावे या उद्दांत हेतूने या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

या कृषीप्रदर्शनात ३०० पेक्षा अधिक स्टॉल्स असणार आहेत या प्रदर्शनात कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, आत्मा पणनमहामंडळ, पशूसंवर्धन विभाग, कृषी उत्पन्न बाजार समिती मत्स्य संवर्धन विभाग, रेशीम शेती विभाग, वखार महामंडळ या सर्व शासकीय विभागांचा सहभाग असेन या प्रदर्शनास शासनाच्या शेती संदर्भातील विविध योजना व धोरण या विषयांवर कृषी तंज्ञानी थेट संवाद साधता येणार आहे.या प्रदर्शनात शेतीतील विविध क्षेत्रातील विषयतज्ञ आणि शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञानी व्याख्याने ठेवली आहेत.या प्रदर्शनात खते, बि–बियाणे, औषधे, शेती औजारे सौरउर्जा कृषी विषयक पुस्तके, महीला बचत गट यांचे स्टॉल असतील या प्रदर्शनासाठी प्रवेश निशुल्क असेन या प्रदर्शनासाठी भव्य पार्कींगची व्यवस्था, २४ तास जनरेटर, व्यवस्थापन कार्यालय सभागृह, टॉयलेटस, फायर स्टेशन या सर्व बाबींची व्यवस्था असणार आहे.

या प्रदर्शनात लहान मुलांसाठी बालजत्रा व येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी फुड मॉलची व्यवस्था करण्यात आली आहे.

तेव्हा मराठवाडयातील सर्वच शेतक–यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन संतोष नागरगोजे यांनी केले आहे.

यावेळी संतोष नागरगोजे डॉ. नरसिह भिकाने, रणवीर उमाटे,रवि सुर्यवंशी, महादेव कदम, किरण चव्हाण, पांडुरंग कदम,सचिन सिरसाट, भागवत कांदे आधी पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894